# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 20/10/2021 (बुधवार)
(सकाळ)

---

### विनयभंग

पो.स्टे. सावेनर :– दिनांक 29/07/2021 चे 10.00 वा. ते दिनांक 29/09/2021 चे 23.59 वा. दरम्यान 32 वर्षीय फिर्यादी/पीडित व आरोपी नामे– मोहम्मद अब्दुल माजीद फारुक अहमद, रा. आंबेडकर मार्केट जवळ दिग्रस यवतमाळ याच्या कंपणीने स्टॉफसाठी व त्यांचे येण्या–जाण्या साठी आटो रिक्षाची व्यवस्था केली असल्याने फिर्यादी व आरोपी तसेच सहकारी स्टॉफ नमुद ऑटो रिक्षा ने जात येत होते. त्यादरम्यान आरोपीने फिर्यादीशी इतरांपेक्षा जास्त बोलुन जवळीक करण्याचा प्रयत्न केला. तसेच ज्या ज्या वेळी फिर्यादी व आरोपी हे कंपनीत ऑटो रिक्षाने जात असतांना आरोपीने फिर्यादीशी अधिक लगट करुन 'तु चष्मा घालू नको छान दिसत नाही' तसेच 'डोक्यावर ओढणी घे छान दिसत आहे'. असे म्हणुन तसेच फिर्यादी यांना त्याचे राहते रुम वरील टेरीस वर एकटक पाहून व राहत असलेलया रुमवर काहीतरी कारण सांगून त्या ठिकाणी जावून फिर्यादी यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न करुन तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. तसेच कंपनी मध्ये कामावर असतांना कामानिमीत्य त्यांच्याजवळ जावुन त्यांच्याशी लगट करण्याचा प्रयत्न केला व फिर्यादी यांचे लग्न जमल्यानंतर त्याने त्याचे व्हॉटस अप स्टेटस ला धमकीवजा स्टेटस ठेवले या बाबत फिर्यादीने कंपनी कडे तक्रार केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 ड, 506 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि शिवाजी नागवे मो.न. 9823403565 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कुही – दिनांक 18/10/2021 चे 22.00 वा. ते दिनांक 19/10/2021 चे 04.00 वा. चे सुमारास पो.स्टे. कुही हद्यीत फिर्यादीयांची 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला संशयीत आरोपी नामे– रवी शंकर कुर्रे, वय 22 वर्ष, रा. भैसो ता. पामगड जि. बिलासपुर (छत्तीसगड) ह. मु. पाचगाव याने लग्नाचे आमिष दाखवुन फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री राउत मो. नं. 70207503909 करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर